खडक पोलीस स्टेशन पुणे
दिनांक – २६/०९/२०१७

# प्रेसनोट

---

## घरफोडी चोरी करणारे सराईत तिघेजण अल्पवयीन साथीदारासह जेरबंद चार गुन्हे उघड बत्तीस हजाराचा ऐवज हस्तगत

---

श्री. विनोद अचलदास भंडारी वय-५३ रा – १३०२ शुक्रवार पेठ पुणे यांचे सुभाषनगर मराठा वसतीगृह सुभाषनगर शुक्रवार पेठ पुणे याठिकाणी शांती प्लॅस्टिक नावाचे दुकान आहे. दिनांक – १६/०९/२०१७ रोजी रात्रौ आठ वाजता ते दुकान बंद करुन शटरचे लॉक लावुन घरी गेले असताना दुस-यादिवशी पहाटे तीन पंधरा वाजण्याचे सुमारास तीन अनोळखी इसमांनी दुकानाचे शटर उचकटुन आत प्रवेश करुन काऊंटरच्या ड्रॉवरमधील रोख आठठेचाळीस हजार रुपये चोरुन नेले होते त्याबाबत त्यांनी खडक पोलीस स्टेशन पुणे येथे तक्रार दिलेली आहे.खडक पोलीस स्टेशन पुणे येथील अधिकारी व कर्मचारी गुन्हयाचा तपास करत असताना पोलीस कर्मचारी इम्रान नदाफ व गणेश माळी यांना त्यांचे खब-याकडुन माहीती मिळाली की सदर गुन्हा सराईत गुन्हेगार तौसिफ शेख , अमोल अवचरे व त्यांचा साथीदार पापा यांनी केलेला आहे अशी बातमी मिळाताच पोलीसांनी त्यांचेबाबत माहीती काढुन संशयीतांना साई मंदीरजवळ कॉलनी नंबर १० कासेवाडी भवानी पेठ पुणे याठिकाणी सापळा रचुन संशयीत तौसिफ बशीर शेख वय–१९ रा–कॉलनी नं १० कासेवाडी भवानी पेठ पुणे, अमोल किसन अवचरे वय–१९ रा-सदर व त्यांचा अल्पवयीन साथीदार यांना ताब्यात घेतले आहे त्यांचेकडे गुन्हयाबाबत तपास करता त्यांनी सदर गुन्हा केल्याचे कबुल केले आहे. तसेच त्यांनी खराडी चंदननगर पुणे येथील दोन दुकाने फोडली असुन त्यामध्ये दुकानाचे शटर उचकटुन, खिडकीचे लोखंडी गज वाकवुन दुकानातील इलेक्ट्रिक सामान, मोबाईल, सीपीयु, एलसीडी रोख रक्कम असा एकुण पासष्ट हजार रुपयाचा माल चोरुन नेला त्याबाबत श्री कानिफनाथ दादाभाऊ भरणे वय – ३३ रा – प्लॅट नं अे/१ बी/२ रक्षकनगर गोल्ड सोसायटी खराडी पुणे यांनी चंदननगर पोलीस स्टेशन पुणे याठिकाणी फिर्याद दिलेली आहे. आरोपींच्या ताब्यातुन एकुण बावीस हजार रुपयाचा माल हस्तगत करण्यात आलेला आहे त्यांनी खडक पोलीस स्टेशन, चंदननगर पोलीस स्टेशन पुणे चे हद्दीमध्ये घरफोडी चोरीचे एकुण तीन गुन्हे केल्याचे उघडकीस आलेले आहे.

**तिन्हीही आरोपी पोलीस अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे तौसिफ बशीर शेख याचेविरुध्द यापुर्वी घरफोडी चोरी, जबरी चोरी, इतर चोरीचे बारा गुन्हे तर अमोल किसन अवसरे याचेविरुध्द घरफोडी चोरी व इतर चोरीचे सात गुन्हे दाखल आहेत. आरोपीने अशाप्रकारे घरफोडी व इतर चोरीचे आणखी गुन्हे केले आहेत काय ? त्याचे कोणी साथीदार आहेत काय ? याबाबत पोलीस तपास करत आहेत.**

मा. श्रीमती अे. अेस. मुजुमदार प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सहावे न्यायालय पुणे यांचे न्यायालयात आरोपीस हजर केले असता त्यास दिनांक–२६/०९/२०१७ रोजी पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिलेले आहेत. अल्पवयीन मुलास मा. पिठासन अधिकारी यांचे आदेशानुसार बाल सुधार गृह येरवडा पुणे येथे ठेवण्यात आलेले आहे.

श्री राहुल दत्तात्रय सुरम वय-२४ जयशंकर अपार्टमेंट पालखी विठोबा चौक भवानी पेठ पुणे हे दिनांक – १७/०९/२०१७ रोजी घरात असताना सायंकाळी पाच तीस वाजण्याचे सुमारास अनोळखी मुलगा पत्ता विचारण्याच्या व पाणी पिण्याचे बहाणा करुन आला व त्याने फिर्यादी यांना पाणी आणण्यास सांगीतले ते पाणी आणण्यासाठी गेले असता घरामध्ये चार्जिगला लावलेला मोबाईल फोन चोरुन नेला त्याबाबत त्यांनी पोलीसांकडे तक्रार दिलेली आहे सदर गुन्हयामध्ये पोलीसांनी तपास करुन मिळालेल्या माहीतीनुसार पोलीस अभिलेखावरील सराईत गुन्हेगार रियाज शाकीर शेख वय १९ रा - लोहीयानगर पुणे याला पकडले आहे त्याचे ताब्यातुन एक मोटोरोला कंपनीचा दहा रुपये किंमतीचा मोबाईल फोन हस्तगत केला आहे. त्याचेविरुध्द खडक, समर्थ पोलीस स्टेशन पुणे याठिकाणी एकुण अठरा गुन्हे दाखल आहेत.

सदर कामगिरी परिमंडळ १ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री. बसवराज तेली, शहर विभाग पुणे चे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. बाजीराव मोहीते यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र मोकाशी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री संभाजी शिर्के, पोलीस उपनिरीक्षक संजय गायकवाड, अनंता व्यवहारे व तपास पथकातील पोलीस कर्मचारी सर्फराज शेख, बशीर सैय्यद, बापु शिंदे , विश्वनाथ शिंदे, गणेश माळी, इम्रान नदाफ, अनिकेत बाबर, अशिष चव्हाण, संदिप कांबळे यांनी केलेली आहे.